The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत जनाबाई यांच्या निवडक अभंगाचा अभ्यास

**पूजा पंढरीनाथ घोंगडे**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.

**प्रस्तावनाः-**

संत जनाबाईंनी आपल्या अभंगाची नावे 'दासी जनी' , 'नामयाची दासी'आणि 'जनी नामयाची' अशी ठेवली आहेत. संतांचा आपल्या प्रत्येकाच्या जीवनात खूप महत्त्व आहे. संतांच्या गोष्टी आपल्याला प्रेरित करतात. तसेच आपल्यामध्ये भक्ती भावना निर्माण करतात. महाराष्ट्राला थोर आणि महान संत लाभली आहेत. यापैकी एक संत म्हणजे संत जनाबाई. संत जनाबाई या दासीपणाची, स्वतःच्या शूद्र जातीची आणि इतकेच नव्हे, तर स्वतःच्या स्त्रीपणाची ही जाणीव व्यक्त करणारे अनेक अभंग तिच्या मनातून तिच्या शब्दात आले आहेत. विठ्ठलाला मायबाप आणि सखा जीवाचा मैतर समजणाऱ्या जनीने विठ्ठलाशी त्याबद्दल संवाद साधलेले तिच्या अनेक अभंगातून दिसते.

संत जनाबाई या महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संत कवयित्री होत्या. त्याचा जन्म १२५८ मध्ये परभणी जिल्ह्यातील गंगाखेड नावाच्या गावात झाला त्यांचे वडील दमा हे वारकरी होते. व आई कुरुंद भगवत फक्त होती. ते दोघे विठ्ठलाचे भक्त होते तिच्या जाती बद्दलचा उल्लेख तिच्या अनेक अभंगातून तिने केलेला आहे. जनाबाई पाच वर्षाची असताना आई वारल्यानंतर त्यांच्या वडिलांनी त्यांना पंढरपुरातील संत नामदेवांचे वडील दामाशेट यांच्याकडे नोकरीसाठी पाठवले. लहानग्या नामदेवांना त्यांनी सांभाळले आणि आयुष्यभर त्या त्यांच्या दासी म्हणून राहिल्या. संत जनाबाईंनी ३४० हून अधिक भक्तीगीते अभंग रचली. भक्तीने ओतपोत भरलेली त्यांचे अभंग म्हणजे हृदयातील मधुर भावनेने गुंफलेली भावगीतेच आहेत. त्यांचे अभंग कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा या विषयावर आहेत.

संत जनाबाई यांचे निवडक अभंग

संत जनाबाई त्यांच्या काही अभंगात अधिक धीट झालेल्या दिसतात.कारण त्याच विठ्ठल मंदिरात जाऊन देवास घरी चालण्यासंबंधी विनंती करताना दिसतात.आता गस्तवेळ झाली आहे. बाजारात कोणी जागे नाही. त्यामुळे विठ्ठलाने निशंकपणे जनीच्या मंदिरात जाण्यास हरकत नाही. जनाबाईंनी विठ्ठलाच्या स्वागताची केवढी पूर्व तयारी केली आहे. संत जनाबाई अत्यंत उल्हासित आहेत. त्यांनी गळ्यात मोत्याची माळ परिधान केले आहे. विठ्ठल हे खरे तर नामदेवांना लाभलेले माणिक! पण आता जनाबाईनीच ते हस्तगत केले आहे. जनाबाई विठ्ठलास आपल्या राऊळात घेऊन जात आहेत. गस्त बाजारात फिरत आहेत.जनाबाई राधा वा कृष्णचरित्रातील

एखाद्या गौवळणीची भूमिका स्वीकारत नाहीत. आपली दासी जनी ही वास्तव भूमिकाच त्यांना मान्य आहे म्हणून त्या म्हणतात.

"विठोबा चला मंदिरात। गस्त हिंडती बाजारात।।
रांगोळी घातली गुलालाची। शेज म्या तिने पुष्पांची।।
समया जळती अर्धरात्री। गळ्यांमध्ये माळ मोत्याची।।
नामदेवाला सापडलें माणिक। घेतलें जनीन हातात।।
घेऊनि गेली राऊळात। गस्त हिंडती हकीमाची बाजारात।।"

संत जनाबाई ह्या एक स्त्री आहेत त्यांना अनेक साधुसंतांनी शिकवण दिली की, स्त्री जन्म म्हणून उदास होऊ नये संत नामदेवांसारख्या भक्ती शिरोमणीच्या घरची मी दासी आहे. साक्षात विठ्ठलाने मला आपली प्रेममुद्रा दिली आहे. संत नामदेवांच्या घरी अहोरात्र सेवा करणारी भक्त जनी उधारुन जाणार यात शंका ती कोणती? प्रत्यक्ष विठ्ठलच तिथे माझ्या दृष्टीपुढे साकार होतो. माझ्याशी संवाद करतो, माझ्या कष्टाचे ओझे वाहतो. म्हणून संत जनाबाई पुढील अभंगात म्हणतात.

"स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास।
साधूसंत ऐसें केलें मज।।
संतांचे घरची दासी मी अंकिली।
विठोबाने दिली प्रेमकळा।।
विदुर सात्विक माझिये कुळीचा।
अंगिकार त्याचा केला देवें।।"

संत जनाबाई आपल्या काही अभंगात शिव्या दिल्या आहेत. 'तुझे मढे गेले' असे त्या म्हणत अंगणात उभ्या राहू नशिव्या देत म्हणजे तिचा पांडुरंग कृष्णवतारी गोकुळात शिव्या देणाऱ्या गोपींसमोर जसा हसत हसत उभा राही तसाच आताही हसत सुटत असला पाहिजे.जनाबाईला आपल्या अभंगात विठ्ठलाशी असलेला शाश्वत नात्याचाच साक्षात्कार घडताना दिसतो. तसेच त्यांच्या अभंगात आर्ततेमध्ये आणि व्याकुळते मध्ये कठोर संतापही दिसून येतो. त्या म्हणतात.

"अरे विठ्या अरे विठ्या।मूळ मायेच्या कारट्या।।
तुझी रांड रंडकी झाली। जन्म सावित्री चुडा ल्यावी।।

तुझे गेले मढे। तुला पाहू नकाळ रडे।।
उभी राहु नीअंगणी। शिव्या देती दासी जनी।।"

संत जनाबाईंनी आपल्या अभंगात दु:खाचा नाश होऊन सुखप्राप्ती व्हावी असे म्हणतात. विठ्ठलाच्या कृपेचा अखंड लाभ व्हावा अशी जनाबाई विनवणी करतात. जो भक्त विठ्ठलास अनन्य भक्तिभावाने शरण गेला आहे. त्याची जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्तता व्हावी अशी जनाबाई विठ्ठलाच प्रार्थना करीत आहे. म्हणून त्या म्हणतात.

"माझी दु:खनाशी देवा। मज सुख दे केशवा।।
आम्हां सुख ऐसें देई। तुझी कृपा विठाबाई।।
चरणी अनन्यशरण। त्यासी नाहीं जन्ममरण।।
जनी म्हणें हेंची मागे। धन्या तूज सर्व सांगे।।"

परधर्मीयांच्या प्रार्थनेत भाग घेण्यासंबंधी ख्रिस्ती लोकांमध्ये एक नवीन विचार दृढ होत आहे. हा विचार परधर्मीयांच्या ज्या प्रार्थना अभंगात पौरानिक कथा, देवदेवतांची नावे, अद्‌वैतवादाचा एक अमान्य प्रकार आहे. त्यांच्याविषयी आहे. शब्दरचना किंवा प्रतीके ही कोणाही एखाद्या भक्ताच्या वैयक्तिक इच्छेनुसार नसतात. अनेक लोकांना किंवा भक्तजनांना देव त्यांच्या कार्याविषयी काय वाटते, त्याची श्रद्धा काय आहे, ते आपल्या धर्माचार कसा करतात त्याच्याशी त्याचा संबंध आहे अशा भक्तजनांच्या भावना व त्यांच्या पूजा प्रार्थनेचा अर्थ जाणण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. म्हणून त्या म्हणतात

"काय हे करावें। धनवंतादि अवघे अवघे।।
तुझे नाम नाही जिथे। नको माझी आस तेथें।।
तुजविण बोल न मानीं। करी ऐसे म्हणेजनी।।"

नामस्मरणाचे महत्त्व इतर संताप्रमाणे जनाबाईंनीही ओळखले होते. त्यामुळेच 'विठ्ठलाच्या नाम तारक हे थोर' असा विश्‍वास ती व्यक्त करते. विठ्ठलाच्या नामस्मरणामुळे 'चोखामेळा', अजामेळ उध्दारले असे जनाबाई सांगते. विठ्ठलाच्या नामस्मरणाचा महिमा इतका मोठा आहे की आपल्या जीवनातील प्रत्येक पाऊल पुढे टाकण्याआधी त्याचे नामस्मरण करावे. त्यामुळे आपला उद्धार होईल असे तिला वाटते म्हणून ती म्हणते.

"नाम विठोबांचे घ्यावें। मग पाऊले टाकावें।।
नाम तारक हे थोर। नामें तारिले अपार।।

अजमिळ उध्दरिता। चोखामेळा मुक्तीस नेला।।
नाम दळणी कांडणी। म्हणे नामयाची जणी।।"

संत जनाबाईंना वाटते की स्त्रियांनी उदास न होता सर्वांना अधिकार देणाऱ्या भक्तीमार्गाचा स्वीकार करावा. प्रपंच करीत असतानाही विठ्ठलभक्तीने जीवन सार्थकी लावता येते असे ती सांगते दया, क्षमा, शांती, शुद्ध चरित्र, मृदूभाव वैराग्य या सदगुणांना तिने उपदेश केला आहे. मानवी जीवन सुखी करण्यासाठी या गुणांची आवश्यकता आहे. असे तिला वाटते अनन्यनिष्ठा व भक्तीभावाशिवाय परमेश्वराची प्राप्ती नाही ज्यांच्याजवळ अनन्य भाव असतो त्यालाच विठ्ठल भेटतो म्हणून जनाबाई म्हणते

"भक्तीभावे वळे गा। देव महाराज पंढरीराव।।
पंढरीसी जावे। संत सेना भेटावे।।
भक्ती आहे ज्याचे चित्ती। त्याला पावतो निश्चिती।।
भाव धरा मनी। म्हणे नामयाची जनी।।"

जनाबाई नामदेवाच्या वंशवृक्षाची जशी साक्षीदार होती त्याचप्रमाणे त्यांच्या कीर्तन व भक्तीची ती साक्षीदार होती. नामदेवांचे कीर्तन किती प्रभावी होते देवदेवता त्यांच्या कीर्तनभक्तीत कसे रममान होऊन जात असत याचे जनाबाईंने केलेले वर्णन कीर्तनकार नामदेवांचे सजीव चित्र आपणासमोर उभे करते. या चित्राणातून विठ्ठल भक्तीत रममाण झालेले हे नामदेव आपणासमोर उभे राहतात. तसेच कीर्तनाद्वारे सर्व वैष्णवांना एकत्रित करून 'ज्ञानाचा दीप' लावणारे ध्येयनिष्ठ विठ्ठलभक्त नामदेव आपल्या समोर साकारले जातात.त्या म्हणतात

"सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटे।
नामा वाळवंटी कथा करी।।
ब्रह्मादिक देव येवोनि पाहाती।
जनी म्हणे त्याचे काय वर्णू सुख।।
पाहती जे मुख विठोबांचे।।"

संत जनाबाई यांना वाटते परधन, परकामिनी यांची इच्छा धरू नये वाईट इच्छा नसावी. देवाची सेवा घडावी असे जनाबाईंचे मागणे आहे. कोणत्याही कुळातला, जातीतला असला तरी त्यांच्या अंगी शांती बाणली आहे, तोच संत होय.अशा संतांना जनाबाई वंदन करते. संत आणि देव एकरूप असतात म्हणून जनाबाईला चोखामेळा,कबीर, रोहिदास, कमाल, मुकुंद जोहरी हे एकनिष्ठ वैष्णव वाटतात. लटकेचा नेत्र लावून ध्यान करणाऱ्या दांभिकांवर जनाबाईंनी टीका केली आहे.

गांधारी मुद्रा अंगावर चितारणारे वैष्णव नव्हेत. आई वडिलांचा मान ठेवता उलट त्यांना त्रास देणारे ब्रह्मज्ञान न ऐकणारा दुराचारी, सज्जनांचा अखंड द्वेष करणारा विद्येच्या अहंकारामुळे कीर्तनश्रवण न करणारा स्वत घरादाराचा मोह न सोडता संतांनाच पाखंडी म्हणणारा व त्यांचा उपहास करणारा अशाच दुर्जनांचा विटाळ मानावयास हवा म्हणून चोखामेळा महार असूनही जनाबाईंना तो वैष्णव वाटतो. म्हणून जनाबाई म्हणतात.

"वैष्णव तों एक इतर ती सोंगे।
ठसे देऊनी अंगे चितारिती।।
जिचे योनी जन्माला तिची दंडू लागला।
तीर्थरूप केला देशधडी।।
नाइकोणी ब्रह्मज्ञान जो का दुराचारी।
अखंड द्वेष करी सज्जनांचा।।
विद्येच्या अभिमाने नाइके कीर्तन।
पाखंडी हे म्हणे करिती कायी।।
पंचरस पात्रा कांता हे बुडविती।
उध्दरलो म्हणती आम्ही संत।।
कीर्तनाचा द्वेष करी तो चांडाळ।
तयाचा विटाळ मातंगीसी।।"

संदर्भ ग्रंथ:-
१) इर्लेकर सुहासिनी - संत जनाबाई.
२) इनामदार हेमंत विष्णू- संत जनाबाई: एक भावसंपन्न व्यक्तित्व.

**संत जनाबाई यांच्या निवडक अभंगाचा अभ्यास**

**पूजा पंढरीनाथ घोंगडे**